**महाराष्ट्र शासन**

**महसूल विभाग**

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कोपरगांव, जि. अहमदनगर**

Email Id- kopakopargaonrnt@gmail.com Phone No- 02423-222753

**विषय :- कोरोना व्हायरस संबधी प्रतिबंधात्मक उपायोजना करणेबाबत- शाळा व मुलांचे मुलीचे वसतीगृह अधिगृहीत करणेबाबत..**

**वाचले -1)आपत्ती व्यावस्थापन कायदा 2005**

**2)भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897**

**3)सार्वजनिक आरोग्य् विभाग यांच्या कडील अधिसुचना कोरोना 2020/प्रं.क्र.58/आरोग्य्/5दिनांक 14/03/2020**

**4)मा.जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर यांचेकडील जा क्रंआव्यमपु /कार्या 19अ/210/2020 अहमदनगर दिनांक 19/3/2020 रोजीचे आदेश.**

**5)मा.जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली करोना प्रतिबंधक उपाययोजना आढावा बैठक दिनांक 26/3/2020**

**6) वैदकिय अधिक्षक वर्ग-1 कोपरगाव ग्रामीन रुग्णालय कोपरगाव यांचे जा क्रं.ग्रारुको/जाए.151/-2020 दि.12/4/2020 रोजीचे**

| क्र.कावि/दंडव्य/ 305 /2020 | आदेश | कोपरगांव दि 13/ 04 /2020 |
|---|---|---|

ज्याअर्थी,राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीडी 19)प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये तहसिलदार यांना त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीडी19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आले आहे.

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा संसर्गजन्य आजाराच्या प्रादुर्भावाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहे. कोपरगाव शहरात नुकताच 60 वर्षीय कोरोना बाधीत रुग्ण आढळून आला असुन त्याच उपचारार्थ अहमदनगर येथील जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.सदर संसर्ग पहाता कोपरगाव शहरात सर्दी,ताप,खोकला, यासारखे लक्षणे असलेला रुग्णआढळून आल्यास त्यास प्रथम कोरोना केअर सेंटर मध्ये भरती करुन त्यांच्यावर उपचार सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे.

ज्याअर्थी, संदर्भाधीन 6 अन्वये मा.वैदयकिय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय कोपरगाव यांनी **एस.एस.जी.एम.कॉलेज132 केव्ही सबस्टेशन जवळ येवला नाका कोपरगाव जिल्हा.अहमदनर** येथील मुलांचे व मुलीचे वसतीगृह कोरोना केअर सेंटर घोषित करण्यासाठी प्रस्तावित केलेले आहे.

त्याअर्थी, मी तहसिलदार कोपरगाव आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 65 व साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोपरगाव तालुका व शहर हददीतील **एस.एस.जी.एम.कॉलेज (मुलाचे व मुलीचे वस्तीगृह) 132 केव्ही सबस्टेशन जवळ येवला नाका कोपरगाव जिल्हा.अहमदनर** हे कोरोना केअर सेंटर म्हणून घोषित करीत आहे. व कोरोना केअर सेंटर तयार करणेसाठी तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेश होई पावेतो अधिगृहीत करीत आहे.

(योगेश चंद्रे)

**तहसिलदार तथा तालुका,**

**दंडाधिकारी कोपरगांव.**

**प्रत- मा.जिल्हाधिकारी साहेब अहमदनगर आपत्ती व्यवस्थापन शाखा यांना माहितीसाठी**

**प्रत- तालुका वैदयकिय अधिकारी पंचायत समिती कोपरगाव व वैदयकिय अधिक्षक वर्ग -1 ग्रामीन रुग्णालय कोपरगाव शहर**

2/- एस.एस.जी.एम कॉलेज मुलाचे व मुलीचे वसतीगृह ताब्यात घेऊन सर्व साहित्य व परिसर स्वच्छता व निर्जतुकीकरण करावे तसेच तातडीने त्या ठिकाणी कोरोना केअर सेंटर स्थापन करावा. अधिग्रहण संमाप्त झाल्यांनंतर मुलाची व मुलीचे वस्तीगृहाची इमारत व यंत्रणा स्वच्छता व निर्जतुकीकरण सुव्यवस्थीत संबधीतांचे ताब्यात देवुन अहवाल सादर करावा.

**प्रत- प्राचार्य,एस.एस.जी.एम.कॉलेज (मुलाचे व मुलीचे वस्तीगृह) 132 केव्ही सबस्टेशन जवळ येवला नाका कोपरगाव जिल्हा अहमदनगर**

तहसिलदार कोपरगांव जिल्हा-अहमदनगर

SRT 13.4.2021

(योगेश चंद्रे)

तहसिलदार तथा तालुका,

दंडाधिकारी कोपरगांव

# तहसिल कार्यालय कोपरगाव

(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन शाखा)

| क्र. कावि/दंडव्य/३११/२०२० | आदेश | कोपरगाव दि १४ /०४/२०२० |
|---|---|---|

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग अधिनियम १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३,४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. तसेच मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अहमदनगर यांनी कोरोना विषाणु (कोव्हीड-१९) या प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना चा भाग म्हणुन अहमदनगर जिल्हामध्ये नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी जिल्हातील सर्व महानगरपालीका, नगरपालीका, नगरपंचायत क्षेत्रातील ज्या ठिकाणी मोठयाप्रमाणात गर्दी होऊ शकेल असे कोणतेही ठिकाण होणारी गर्दी टाळण्यासाठी वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास आदेशीत करण्यात येते की, सध्यपरीस्थितीत COVID-१९ हा आजार संपुर्ण देशामध्ये पसरत चालला आहे. सदर आजाराची परीस्थिती दिवसोंदिवस वाढत चालला आहे. सदर आजाराचा भविष्यात जास्त प्रसार झाल्यास सबंधित रुग्णांना वैदयकिय उपचारासाठी ठेवणेकामी आपल्या आस्थापना, इमारतींसहीत अधिग्रहित करणे आवश्यक आहेत. त्यामुळे मी तहसिलदार कोपरगाव, ईंसिडेंट कमांडर मला प्राप्त अधिकारान्वये खालील आस्थापणा व इमारती पुढील आदेश होईपावेतो अधिग्रहित करण्यात येत आहे.

| अ.नं. | आस्थापनेचे नाव | अधिग्रहित करण्यात आलेल्या आस्थापना | कोणत्या सुविधेसाठी अधिग्रहण केले आहे. |
|---|---|---|---|
| १ | एस.एस.जी.एम कॉलेज | संपुर्ण BOYS & GIRL HOSTEL पाणी व स्वच्छता व्यवस्थेसह | COVID CARE CEANTRE |
| २ | संचालक आत्मा मलिक संस्था | मराठी मेडीयम व इंग्लीश मेडीयम हॉस्टेल पाणी व स्वच्छतेच्या सुविधेसह | COVID CARE CEANTRE |
| ३ | संचालक आत्मा मलिक हॉस्पिटल | संपुर्ण हॉस्पिटल सर्व OXYGEN सुविधा, VEUNTILATAR सुविधा, सर्व वैदयकिय स्टाफ , ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहीका, पाणी वीज इ. सुविधेसह. | DETICATED HEALTH CARE CENTRE |
| ४ | चेअरमन, संजीवनी एजुकेशन सोसायटी | ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहीका वाहनचालकासोबत | COVID CARE CEANTRE साठी |

वरील कॉलम ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सर्व आस्थापना , इमारती , इतर सुविधा या आज दिनांक १४/०४/२०२० पासुन पुढील आदेश होईपावेतो अधिग्रहित करण्यात येत आहे. सदर सुविधा हया आपत्ती व्यावस्थापन कायदा २००५ कलम ३०(२) नुसार अधिग्रहित करण्यात येत आहे, त्यामुळे सर्व खालील नमुद वरील यांनी सहकार्य करावे, अन्यथा आपत्ती व्यवस्थापन कायदया अंतर्गत कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(योगेश चंद्रे)
तहसिलदार तथा,
कार्यकारी दंडाधिकारी कोपरगाव

प्रत -
१) मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
२) मा. उपविभागिय अधिकारी, शिर्डी भाग शिर्डी यांचेकडेस माहितीसाठी.
३) प्राचार्य, एस.एस.जी.एम. कॉलेज, कोपरगाव यांचेकडेस कार्यवाहीसाठी
४) संचालक, आत्मा मलिक संस्थान व हॉस्पीटल, कोकमठाण यांचेकडेस कार्यवाहीसाठी
५) चेअरमन, संजीवनी इंस्टीटुट , कोपरगाव यांचेकडेस कार्यवाहीसाठी

(योगेश चंद्रे)
तहसिलदार तथा,
कार्यकारी दंडाधिकारी कोपरगाव

**Rayat Shikshan Sanstha's**

**Shri Sadguru Gangageer Maharaj Science, Gautam Arts and Sanjivani Commerce College, Kopargaon, Dist. Ahmednagar. 423601**

## Conversion of Ladies Hostel as a Dedicated Covid Care Centre

**(Academic Year 2020-21)**

# Some Photographs




Principal
S.S.G.M.College
Kopargaon




Principal
S.S.G.M.College
Kopargaon





Principal
S.S.G.M.College
Kopargaon





Principal
S.S.G.M.College
Kopargaon





Principal
S.S.G.M. College
Kopargaon